# 'शिवस्वराज्य दिन'

## <u>६ जुन २०२२ ( शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद ) -</u>

रयतेच्या हिताचा कारभार कसा असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला राज्यकारभार. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारत वर्षाचे प्रेरणास्थान आहेत. राष्ट्रनिर्माता असलेल्या महापुरुषाच्या , लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्वाचा दिवस म्हणजेच ६ जुन, १६७४ म्हणजेच शिवराज्याभिषेक दिन होय. त्यानुसार दिनांक ६ जुन हा दिवस आपल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे 'शिवस्वराज्य दिन' म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील अध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमेश कहाळेकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. कार्यक्रमाला डीन अकॅडेमीक्स डॉ. डी. जी. रेगुलवार, डीन क्वालीटी आशुरन्स डॉ. ए. स भालचंद्र, माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख प्रा. अंजना घुले, व इतर प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विध्यार्थी यांनी सहभाग नोंदवला.



सकाळचा सत्रात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमेश कहाळेकर व प्रा.संतोष अटीपामुलू डीन ऑफ स्टुडन्ट ऍक्टिव्हिटीएस यांच्या उपस्थितीत सामाजिक संदेश देणारी **शिवज्योत रॅलीचे** आयोजन करण्यात आले होते. तसेच महाराजांच्या पालखीची ढोल ताश्याचा गजरात महाविद्यलयाचा परिसरात मिरवणूक काढण्यात आली.







मुख्य कार्यक्रम IT  सेमिनार हॉल मध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन व महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून करण्यात आली . महाराष्ट्रगीताने या पवित्र मातीला वंदन करून गडकिल्यावर आधारित छायाचित्रांचे लघुपट दाखवण्यात आले.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक, संतोष अटीपामुलू डीन ऑफ स्टुडन्ट ऍक्टिव्हिटीएस यांनी केले. श्री. प्राक्तन पांडव यांनी शिवाजीमहाराज्यांचा कारकिर्दीवर उजाळा टाकणारे व्याख्यान दिले. या प्रसंगी कु. चेतना कोडते हिने पोवाडा सादर केला. शिव स्वराज्य दिनानिमित्त निबंध आणि चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी निबंध स्पर्धेतील विजयी तेजस मोहिते , शंकर जुजगर व चित्रकला स्पर्धेतील विजयी राधा बिहाडे , देवांशी पाटील  यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षदा राजपूत यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता तन्मय सोनवणे वाईस प्रेसिडेंट स्टुडंट्स कौन्सिल यांनी आभारप्रदर्शन करून केली.